महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

मध्यवर्ती कार्यालय, हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन,
सेनापती बापट मार्ग, एलफिन्स्टन, मुंबई ४०००१३
दूरध्वनी क्रमांक: ४३२२६८००/४३२२६८१७
ई-मेल - prog.mlwb-mh@gov.in


जा.क्र.मका/कार्यक्रम/२०१८-२०१९/५६८८ दिनांक : १३-७.२०१८

परिपत्रक

विषय:- महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडे कामगार कल्याण निधी भरणाऱ्या कामगारांना "प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना" अंतर्गत लाभ देणेबाबत.

संदर्भ:- मका/कार्यक्रम/२०१७-१८/२१४ दिनांक १७.४.२०१७.

या कार्यालयाचे वरील संदर्भिय परिपत्रकान्वये महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडे कामगार कल्याण निधी भरणाऱ्या कामगार/कर्मचाऱ्यांना "प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना" लागू करण्यात आली आहे.

या योजने अंतर्गत वरील संदर्भिय परिपत्रकातील सर्वसाधारण नियम व अटी त्याच राहतील; तथापि, कामगारांना लाभ मिळण्याकरिता येणाऱ्या अडचणी विचारात घेऊन पुढीलप्रमाणे नियम व अटीनुसार कार्यवाही करावी.

१. अर्जदाराने सोबत जोडलेल्या नमुन्याप्रमाणे अर्ज जवळच्या कामगार कल्याण केंद्रामध्ये सादर करावा.
२. सदरच्या योजनेअंतर्गत लाभाची रक्कम लाभार्थीच्या बँक खात्यावर जमा करण्यात यावी.
३. अर्ज सादर करतेवेळी लाभार्थीच्या बँक खात्यामधून रु.१२/-(रुपये बारा)इतकी रक्कम वजा झाली असल्यास त्याचा पुरावा अर्जासोबत जोडण्यात यावा किंवा हमीपत्र घेण्यात यावे.

या योजनेअंतर्गत केंद्र प्रमुखांनी अर्ज स्विकारुन अर्जाची तपासणी करुन अर्ज स्विकारल्यानंतर सात दिवसात गट कार्यालयास सादर करावे. गट प्रमुखांनी अर्जाची तपासणी करुन त्यांना प्राप्त झालेल्या तारखेपासून सात दिवसात विभागीय कार्यालयास सादर करावे. विभाग प्रमुखांनी या योजनेच्या नियम व अटींचे काटेकोरपणे पालन करुन अर्जांना सात दिवसात मंजूरी देऊन योजनेची रक्कम एनइएफटी/आरटीजीएसव्दारे संबंधित लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात यावी.

सदर योजनेच्या अंमलबजावणीबाबत वरीलप्रमाणे त्वरीत कार्यवाही करण्यात यावी.

कल्याण आयुक्त

सोबत : अर्जाचा नमुना.